# मेट्रो ३च्या विधान भवन स्थानकाचे साचा बांधकाम पूर्ण

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** मेट्रो ३ प्रकल्पातील विधान भवन स्थानकाचे साचा (स्टेशन बॉक्स) बांधकाम पूर्ण झाल्याचे, मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने सांगितले. कुलाबा ते सीप्झ या संपूर्ण मार्गिकेवर २६ स्थानके असून, यापूर्वी एमआयडीसी अंधेरी या स्थानकाचे साचा (स्टेशन बॉक्स) बांधकाम पूर्ण झाले आहे.

मेट्रो ३ च्या पॅकेज एक अंतर्गत विधानभवन मेट्रो स्थानक परिसरातील प्रशासकीय व कंपनी कार्यालयांमुळे महत्त्वाचे आहे. साचा बांधकामाबरोबरच स्थानकाचे एकूण ७५.४५ टक्के काम पूर्ण झाले आहे. यामध्ये तळाचा स्लॅब, तळमजला आणि पहिला मजला यातील पोटमजला स्लॅब, कॉनकोर्स स्लॅब आणि छताचा स्लॅब अशा कामांचा समावेश आहे. विधान भवन स्थानकाचे बांधकाम 'कट आणि कव्हर' या आधुनिक पद्धतीने करण्यात आले आहे. 'मुंबई मेट्रो ३ मार्गिकेवरील विधान भवन स्थानकावर वर्दळ अधिक प्रमाणात असेल. याद्वारे मंत्रालय, विधान भवन, नवीन प्रशासकीय इमारत जोडले जातील, असे एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल म्हणाले. मार्गिका कार्यान्वित झाल्यावर या स्थानकावरून ७५ हजारांपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करणे अपेक्षित आहे. या स्थानकात प्रवाशांसाठी सात प्रवेश-निकासद्वारांची सुविधा आहे. पॅकेज १ अंतर्गत हुतात्मा चौक , चर्चगेट आणि कफ परेड या मेट्रो स्थानकाची कामेदेखील वेगात सुरू असल्याची माहिती एमएमआरसीने दिली.

लोकसत्ता Thu, 0 https: